# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी-२०२२/शिष्यवृत्ती शाखा/ (१२२४/२२)/ ४२४ दिनांक : ०३.०३.२०२२

**तात्काळ / अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे तसेच संबंधित अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य-२०२१/ डीबीटी /१६६९ दि. ०३.०३.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू योजनांसाठी दि. २८.०२.२०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज करणेसाठी मुदत देण्यात आलेली होती.

विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संदर्भिय पत्रानुसार, उच्च शिक्षण संचालनालया मार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांसाठी **सन २०२०-२१ करीता ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे त्रुटी पूर्तता करुन Re-Apply करणेसाठी दि. ३१.०३.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२१-२२ करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरणेसाठी दि. ३१.०३.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

**सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी महाडीबीटी पोर्टल वर शिष्यवृत्तीसाठी मुदतपूर्व अर्ज भरणेसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना सूचना फलक, विविध सोशल माध्यमांद्वारे कळविण्यात यावे. जेणेकरुन विद्यापीठ /संस्था /महाविद्यालय यांमधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे